# सुस्वागतम



# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
## छत्रपती संभाजीनगर

महाराष्ट्र शासन तंत्रशिक्षण संचालनालय
राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्


ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी
स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

## १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिम मूल्यमापन सादरीकरण

०२ मे, २०२५

# संकेतस्थळ https://dteau.org

- वापरण्यास सुलभ, लोकाभिमुख, सर्वसमावेशक, अद्ययावत, व्दिरुक्ती विरहीत
- दिव्यांगासाठी सुगम
- स्क्रीनरीडर यासारख्या सुविधांचा समावेश करण्यात आला आहे.
- संकेतस्थळ हे माहितीपूर्ण आणि लोकाभिमुख असल्याचा अभिप्राय समक्ष भेटीत ब-याच संबंधित घटकांनी (Stake Holders) दिला आहे.



# माहितीचे अद्यावतीकरण

- कार्यालयाच्या संकेतस्थळावर महत्वाचा पत्रव्यवहार, विविध परिपत्रके, शिष्यवृत्ती बाबत सुचना, विभागीय स्तरावरील वर्ग-3 व वर्ग-4 कर्मचा-यांची जेष्ठता सुची वेळोवेळी अदयावत करुन प्रदर्शित केली जाते.
- कार्यालयातील विविध कार्यासन व कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांची यादी प्रदर्शित केलेली आहे.

Joint Director, Technical Education, Regional Office, Chhatrapati Sambhajinagar
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

Home | Circulars | Admissions | RTI | Citizen Charter | Quotations | Contact Us | Screen Reader

## Circulars (परिपत्रक)

| तारीख | विषय | विभाग | संस्था |
|---|---|---|---|
| 21-04-2025 | महत्वाचे परिपत्रक :<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांकरिता BBA-BCA अभ्यासक्रम राबविण्या-या संस्थांचे शैक्षणिक शुल्क, विकास शुल्क व परीक्षा शुल्क मान्यतेस्तव सादर करण्याबाबत... | शिक्षण विभाग | सर्व BBA-BCA अभ्यासक्रमाच्या संस्था |
| 17-04-2025 | महत्वाचे परिपत्रक :<br>फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या मानकाप्रमाणे नवीन संस्था/ नवीन अभ्यासक्रम इ. सुरू करण्याबाबतच्या प्रस्तावांची काटेकोरपणे तपासणी करून प्राधिकरणाच्या आवश्यकतेनुसार शासनाच्या ना-हरकत प्रमाणपत्र / शासन मान्यताकरीता संस्थांचे प्रस्ताव संचालनालयास सादर करण्याबाबत.... | शिक्षण विभाग | सर्व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था |
| 17-04-2025 | महत्वाचे परिपत्रक :<br>शैक्षणिक वर्ष 2025-26 करीताच्या विद्यमान संस्थेतील पीसीआय, नवी दिल्ली या शिखर संस्थेच्या अधिपत्याखाली अभ्यासक्रमांच्या व प्रस्तावित नवीन संस्थेच्या मान्यता प्रक्रियेबाबत.... | DTE | सर्व संस्था |
| 15-04-2025 | महत्वाचे परिपत्रक :<br>Encouragement of Technical institutions to participate in India's Drone Innovation Challenge hosted by Drone Federation India & MeitY, Govt. of India... | DTE | सर्व संस्था |
| 15-04-2025 | महत्वाचे परिपत्रक :<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांकरिता विद्यार्थी/संस्था स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जांवर कार्यवाही करण्याबाबत... | शिक्षण विभाग | सर्व संस्था |
| 07-04-2025 | परिपत्रक :<br>अंतिम सेवाजेष्ठता सूची दि. ०१-०१-२०२५<br>इयत्ता १२वी (विज्ञान) परीक्षा भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र विषयासह उत्तीर्ण असलेल्या प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) कर्मचा-यांची अंतिम सेवाजेष्ठता सूची | आस्था-३ ओएस विभाग | सर्व शासकीय संस्था |
| 01-04-2025 | महत्वाचे परिपत्रक :<br>कालमर्यादित : दि.२१-०४-२०२५ :<br>मत्ता व दायित्वे यांची वार्षिक विवरणपत्रे सादर करणेबाबत<br>(आर्थिक वर्ष २०२४-२५ या स्थितीस अनुसरून) ... | आस्था-१ विभाग | सर्व शासकीय संस्था |
| 24-03-2025 | महत्वाचे परिपत्रक :<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाडीबीटी पोर्टलवर तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांकरिता विद्यार्थी/संस्था स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्जांवर कार्यवाही करण्याबाबत... | शिक्षण विभाग | सर्व संस्था |
| 17-03-2025 | महत्वाचे परिपत्रक :<br>गट-क शासकीय कर्मचा-यांच्या प्रशासकीय बदल्याबाबत... | आस्था-३ विभाग | सर्व शासकीय संस्था |
| 13-03-2025 | महत्वाचे परिपत्रक :<br>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एमबीए इंटीग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांचे शुल्काबाबत... | शिक्षण विभाग | सर्व BBA-BCA अभ्यासक्रमाच्या संस्था |
| 11-03-2025 | परिपत्रक :<br>अंतिम सेवाजेष्ठता सूची दि. ०१-०१-२०२५<br>पंप परिचर / ग्रंथालय परिचर / नाईक (चतुर्थश्रेणी) कर्मचा-यांची अंतिम सेवाजेष्ठता सूची | आस्था-३ ओएस विभाग | सर्व शासकीय संस्था |
| 11-03-2025 | परिपत्रक :<br>अंतिम सेवाजेष्ठता सूची दि. ०१-०१-२०२५<br>शिपाई / हमाल / माळी / पहारेकरी / सफाईगार / यंत्र परिचर / इंजिन परिचर / प्रयोगशाळा परिचर | आस्था-३ ओएस विभाग | सर्व शासकीय संस्था |
| 11-03-2025 | परिपत्रक :<br>अंतिम सेवाजेष्ठता सूची दि. ०१-०१-२०२५<br>लिपिकवर्गीय कर्मचारी | आस्था-३ ओएस विभाग | सर्व शासकीय संस्था |

# माहिती अधिकार कायदा २००५

- या कायद्या अंतर्गत आवश्यक अद्यावत 17 मुद्यांची माहिती प्रदर्शित करण्यात आली आहे.
- अद्यावत नागरिकांची सनद प्रदर्शित केलेली आहे.
- कार्यालयातील जनमाहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे नाव, पदनाम व ई-मेल आयडी प्रदर्शित करण्यात आलेले आहे.



Joint Director, Technical Education, Regional Office, Chhatrapati Sambhajinagar
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

Home Circulars Admissions RTI Citizen Charter Quotations Contact Us Screen Reader

माहिती अधिकार अधिनियम २००५

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे माहिती अधिकार कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.

माहिती अधिकाऱ्यांचे माहिती

| अ. क्र | नाव व पदनाम | पदनाम | संपर्क क्र. व इमेल आयडी |
|---|---|---|---|
| १ | **श्री. अक्षय जोशी** प्र. सहसंचालक | अपिलीय अधिकारी | 0240-2334216, 2334769, Ext. No. 211, roaurangabad@dtemaharashtra.gov.in |
| २ | **श्री. व्ही. एम. बोरटकर** सहा. संचालक (अतां) | जन माहिती अधिकारी | 0240-2334216, 2334769, Ext. No. 202, roaurangabad@dtemaharashtra.gov.in |

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५
कलम 4(1)(ब) :- तंत्रशिक्षण संचालनालय म.रा.मुंबई (मुख्यालय)

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत १७ मुद्दे

Home Circulars Admissions RTI Citizen Charter Quotations Contact Us Screen Reader

# राज्य शासनाशी समन्वय

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) या योजनेअंतर्गत या विभागातील शासकीय तंत्रनिकेतन, धाराशिव या संस्थेसाठी Gender inclusion and Equity Intiatives या घटकाअंतर्गत १० कोटी निधी मंजूर

# शिष्यवृत्ती योजनांची अंमलबजावणी

| अ.क्र. | शिष्यवृत्तीचे नांव | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| 01 | अल्पसंख्याक शिष्यवृत्ती | 4617 |
| 02 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती | 28425 |
| 03 | डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना | 14522 |
| | **एकुण** | 47564 |

या विभागाव्दारे सातत्याने कार्यवाही करुन एकुण 47,564 एवढया विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीचे अर्ज मंजुर करण्यात आले

महाराष्ट्र शासनाने मुलींसाठी मोफत शिक्षण ही योजना सुरु करण्यात आल्याने शै.वर्ष 2024-25 प्रवेशित 549 विद्यार्थीनीकडुन महाविद्यालयांनी जमा केलेले शैक्षणिक शुल्क परत करण्यात आले.

# विभागाव्दारे केलेली इतर महत्वाची कार्ये

## १. Community Development योजना

या विभागातंर्गत शासकीय व अशासकीय अनुदानित 6 संस्थांमध्ये योजना राबविण्यात येत आहे

- 60 लाख निधी प्राप्त (2024-25)

## २. न्यायालय प्रकरणे

१. WP 11188 OF 2024 SHRI ATUL VASANTRAO WARANGULE
२. WP 11176 OF 2024 SHRI NITIN MEGHRAJ GAIKWAD
३. WP 8640 OF 2024 MARATHWADA SHIKSHAN PRASARAK MANDAL

या प्रकरणातील मा.न्यायालयाच्या दिनांक 25.03.2025 रोजी दिलेल्या आदेशात विभागीय स्तरावरील तक्रार निवारण अपीलीय समितीचा संपुर्ण संदर्भ घेऊन आदेशात समितीने केलेली कार्यवाही योग्य असल्याने सर्व अर्जदारांची मागणी पुर्ण करण्याबाबत मा.न्यायालयाने संबंधीत संस्थेला आदेशीत केले.

# अभिलेख स्वच्छता

१. **अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण :**

अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण वेळोवेळी करण्यात येत असुन यापूर्वीचे वर्गीकरण मार्च 2025 मध्ये पूर्ण.

**२. मुदतबाहय अभिलेखे नष्ट करण्यात आले आहेत.**

**३. जडवस्तु संग्रह नोंदवही अद्यावतीकरण :**

जडवस्तु संग्रह नोंदवही वेळोवेळी अद्यावत करण्यात येत असुन यापूर्वीचे अद्यावतीकरण मार्च 2025 मध्ये पुर्ण.

**४. जडवस्तू संग्रहातील वस्तूची अंतर्गत पडताळणी करण्यात आली आहे.**

**५. जुन्या व निरुपयोगी जडवस्तूंची विल्हेवाट :**


जुन्या व निरुपयोगी जडवस्तू जसे कालबाहय संगणक, झेरॉक्स मशीन, प्रिंटर व तुटलेले फर्निचर इत्यादीची निर्लेखन करुन विहित पध्दतीने विक्री केली जात असून निर्लेखन केलेल्या वस्तूंची यापूर्वीची विल्हेवाट मार्च 2023 मध्ये लावण्यात आली आहे तसेच काही सुस्थितीत असलेली यंत्रसामग्री व उपकरणे शासकीय संस्थांना विद्यार्थ्यांच्या हितास्तव हस्तांतरीत करण्यात आली आहे.



# तक्रार निवारण

**१. आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण :**

- विभागीय कार्यालय स्तरावर दिनांक 01 मे, 2025 पर्यंत प्राप्त झालेल्या 48 तक्रारींचे 100% निराकरण करण्यात आलेले आहे.



# तक्रार निवारण

- **पी.जी.पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण :**
  विभागीय स्तरावर दिनांक ०१ मे, २०२५ पर्यंत प्राप्त झालेल्या १२ तक्रारींचे १००% निराकरण करण्यात आलेले आहे.

01/05/2025, 10:16 PG Portal Pi chart | DIT, Government of Maharashtra

**तक्रारी**

| | | | |
|---|---|---|---|
| Submitted 0 | Escalated to higher authority 0 | Assign to subordinate 0 | Reassigned 0 |
| | | Transferred 0 | Forwarded For Inputs 0 |
| Received with Input 0 | Resolved 11 | Closed 1 | Send To CPGRAMS 0 |

Closed Satisfied (1) Closed Dissatisfied (0)

**Grievance Pie Chart**



# कार्यालयीन सोई सुविधा

१. **कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था :** या कार्यालयात थंड व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची कायमस्वरुपी सोय उपलब्ध आहे.



२. **कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था:**

पुरुषांकरिता 2 प्रसाधन गृहे व महिलांकरिता 1 प्रसाधनगृहे उपलब्ध असुन त्याची स्वच्छता दररोज दोन वेळा करण्यात येते.

३. अभ्यागतासाठी सहसंचालकांच्या दालनाबाहेर सुसज्ज प्रतिक्षालय उपलब्ध आहे.



# कार्यालयीन सोई सुविधा

४. कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे:

विभागीय कार्यालयास भेट देणा-या सर्व नागरिकांकरिता सुविधा व माहिती होण्याच्या दृष्टीने अंतर्गत कार्यासने, अधिका-यांचे दालने, सभागृहे इ.ठिकाणी सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आलेली आहेत.

५. कार्यालयाचे सौंदर्यीकरण :

कार्यालयाच्या इमारतीला बाहेरुन रंगरंगोटी करण्यात आलेली आहे.

संपर्ण कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार कुंडया  ठेवण्यात आलेल्या आहेत तसेच कार्यालयाच्या परिसरात शोभिवंत झाडे लावण्यात आली आहेत.





# कामकाजातील सुधारणा

१. **ई-ऑफीस प्रणालीतील ४ किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेऊन प्रकरणांचा निपटारा करणे:**

- ई-ऑफीस अंतर्गत विभागीय कार्यालयातील सर्व कार्यासनामध्ये 3 ते 4 स्तरावर मान्यता घेवून प्रस्ताव संचालनालयास सादर करणे तसेच संबंधित कार्यालये/संस्थांना पाठविणे याप्रमाणे निपटारा करण्यात येत आहे.
- विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व शासकीय संस्थामध्ये ई-ऑफीसव्दारे 2 ते 3 स्तरावर मान्यता घेवून कार्यवाही करण्यात येते.
- येणारे टपाल ई-ऑफीस अंतर्गत स्कॅन करुन संबंधित कार्यासननिहाय वर्गीकरण करुन ई-ऑफीसव्दारे वर्ग करण्यात येते.

२. **ई-ऑफीसव्दारे निकाली काढलेल्या नस्त्यांची टक्केवारी (80%)**

३. **वृत्तपत्रातील शासन विरोधी प्रसिध्द होणा-या बातम्यांबाबत स्पष्टीकरण / खुलासा वेळीच प्रसिध्द करणे :**

प्रसार माध्यमांसोबत असलेल्या पारदर्शक संवादामुळे बातमी प्रसारणाआधीच खातरजमेसाठी विचारणा होते. त्यामुळे या विभागाशी संबंधित शासन विरोधी बातम्यांचे प्रमाण नगण्य.

# स्कुल कनेक्ट उपक्रम

१. या विभागातंर्गत शासकीय, अशासकीय तंत्रनिकेतनांकडुन 8 जिल्हातील विविध 2,181 शाळांना भेटी देण्यात आल्या.

२. या उपक्रमातुन एकुण 85,017 विद्यार्थ्यापर्यंत संचालनालयामार्फत चालविण्यात येणा–या विविध पदविका अभ्यासक्रमांची माहिती पोहचविण्यात आली. तसेच पदविका अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर उपलब्ध रोजगारांच्या संधीविषयी मार्गदर्शन केले.

३. या उपक्रमातुन विद्यार्थ्यांना पदविका अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांविषयी माहिती देण्यात आली.

सकाळ

## पॉलिटेक्निकसाठी ८५ हजार विद्यार्थ्यांशी 'स्कूल कनेक्ट'

### तंत्रशिक्षण संचालनालयाचा उपक्रम : प्रवेश वाढविण्यासाठी २,१८१ शाळांना भेटी

■ सकाळ वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर : विद्यार्थ्यांचा पॉलिटेक्निककडे कल वाढावा आणि प्रवेश वाढावेत, यासाठी तंत्रशिक्षण संचालनाल्याने 'स्कूल कनेक्ट' या उपक्रमाला डिसेंबरमध्ये सुरवात केली. दहावीचे विद्यार्थी आणि पालकांना भेटीसाठी जिल्हा तालुकास्तरावर समन्वय अधिकाऱ्यांमार्फत शाळा भेटी दिल्या जात आहेत. तीन महिन्यांमध्ये मराठवाड्यातील २,१८१ शाळांमध्ये जाऊन ८५,०१७ विद्यार्थ्यांपर्यंत माहिती पोचवण्यात यश आल्याची माहिती तंत्रशिक्षण सहसंचालक अक्षय जोशी यांनी दिली.

शिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, काही शिक्षकांची एकत्रित सभा घेऊन तंत्रशिक्षणच्या पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाबाबत जनजागृती करावी. तंत्रशिक्षणामुळे नोकरीच्या संधी कशा लवकर उपलब्ध होतात, त्या शिक्षणाचे फायदे मुख्याध्यापक शिक्षकांच्या नजरेस आणून ते विद्यार्थ्यांत पोचवण्यासाठी प्रयत्न करा, अशा सूचना संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी पॉलिटेक्निकच्या प्राचार्यांना दिल्या होत्या. त्यानुसार कौशल्य विकास वृद्धीसाठी अभ्यासक्रम सुरू करून एक्स्पेरिमेंटल लर्निंग या संकल्पनेनुसार पहिल्या वर्षापासून मायक्रो प्रकल्प अनिवार्य केले आहेत. शाळा भेटी, पीपीटी प्रेझेंटेशन, त्यासाठी गावोगावी करिअर फेअर आयोजित करण्यात येत असल्याचे तंत्रशिक्षण सहसंचालक अक्षय जोशी यांनी सांगितले.

| जिल्हा | शाळा संख्या | विद्यार्थी संख्या |
|---|---|---|
| ■ संभाजीनगर | ५१८ | १७,९०२ |
| ■ बीड | २३५ | ९,९५५ |
| ■ हिंगोली | ९३ | ५७७९ |
| ■ जालना | २६९ | ९४९२ |
| ■ लातूर | २१२ | ६९५८ |
| ■ नांदेड | ४७२ | १८२८६ |
| ■ धाराशिव | २२३ | ८६१२ |
| ■ परभणी | १५९ | ८०५४ |

### याविषयी जनजागृती

■ दहावी-बारावीचे निकाल घोषित होण्यापूर्वी प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज भरण्याची सुविधा, अर्ज भरणे, अर्ज निश्चिती यासंबंधीची माहिती दहावीच्या विद्यार्थ्यांपर्यंत पोचवण्याची प्रक्रिया सुरू आहे. स्कूल कनेक्ट संदर्भातील विद्यार्थी व पालकांची माहिती मंडळाच्या ऑनलाइन प्रणालीवर वेळोवेळी अपडेट करण्यात येत असल्याचे प्राचार्यांनी सांगितले.

Aurangabad, Main
04/03/2025 Page No. 3

सकाळ

सकाळ करिअरच्या नवीन वाटा Sky is Limit...

लेखमाला व प्रश्नमंजूषा स्पर्धा

कालावधी : ता. ७ एप्रिल २०२५ ते ६ जून २०२५ (एकूण ६० दिवस)

## पॉलिटेक्निकचा रोजगारक्षम पर्याय



**दहावीनंतर पुढील उच्च शिक्षण घेण्यासाठी आणि नोकरी, रोजगार शोधू इच्छिणाऱ्यांसाठी पॉलिटेक्निक हा एक चांगला पर्याय आहे. हे तांत्रिक शिक्षण विद्यार्थ्यांना व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी देते. पॉलिटेक्निक हा केवळ शिक्षणाचा पर्याय नसून, तो विद्यार्थ्यांना करिअरमध्ये लवकर यशस्वी होण्यासाठी मदत करणारा मार्ग आहे. कमी वेळेत आणि कमी खर्चात चांगल्या संधी मिळवायच्या असतील, तर पॉलिटेक्निक हा उत्तम पर्याय ठरू शकतो.**

तांत्रिक शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना लवकर नोकरी मिळण्याची संधी अधिक असते आणि इच्छुक असल्यास पुढील शिक्षणासाठी अभियांत्रिकी पदवीच्या अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याचा मार्गही उपलब्ध असतो. स्वतःची आवड, कौशल्ये आणि भविष्यातील संधी लक्षात घेऊन योग्य शाखेची निवड महत्त्वाची आहे. पॉलिटेक्निक कोर्स तीन वर्षांचे असून त्यानंतर लगेच नोकरी किंवा अभियांत्रिकी पदवीत पहिल्या वर्षाची सूट मिळते. पदविका आणि पदवीला सहा वर्षे लागतात. तर, अकरावी-बारावीनंतर चार वर्षांच्या अभियांत्रिकी पदवीलाही सहा वर्षे लागतात. मात्र, पदविका आणि पदवी असणाऱ्यांना मागणी अधिक, तसेच संधीही प्राधान्याने मिळते. पॉलिटेक्निक अभ्यासक्रम तांत्रिक कौशल्यांवर भर असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना थेट उद्योग आणि कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी आवश्यक ज्ञान मिळते. वाढत्या औद्योगिकरणामुळे कुशल तंत्रज्ञांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. पॉलिटेक्निक हा खर्चाच्या दृष्टीने अभियांत्रिकी पदवीच्या तुलनेत कमी खर्चिक पर्याय आहे. अल्प उत्पन्न असलेल्या कुटुंबांसाठी हा एक उत्तम मार्ग आहे.

### रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी

पॉलिटेक्निक पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना सरकारी आणि खासगी क्षेत्रातही नोकरीच्या उत्तम संधी उपलब्ध होतात. विविध उद्योग, उत्पादन कंपन्या, बांधकाम क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान कंपन्या आणि सरकारी विभागांमध्ये पॉलिटेक्निक डिप्लोमाधारकांची मागणी आहे. पॉलिटेक्निकमधून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना थेट उत्पादन, संगणक, बांधकाम आणि इलेक्ट्रिकल क्षेत्रात त्वरित रोजगाराच्या संधी मिळू शकतात. तांत्रिक शिक्षण घेतल्यानंतर विद्यार्थी स्वतःचा व्यवसाय सुरू करू शकतात. इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल, सिव्हिल किंवा संगणक क्षेत्रात स्वतःची कंपनी स्थापन करणे शक्य होते.

### संगणक अभियांत्रिकी

- **संधी** : सॉफ्टवेअर विकास, वेब डेव्हलपमेंट, नेटवर्किंग आणि सायबर सुरक्षा
- **नोकरी** : माहिती तंत्रज्ञान कंपन्या, स्टार्टअप्स, डेटा सेंटर

### यांत्रिकी अभियांत्रिकी

- **संधी** : उत्पादन व्यवस्थापन, ऑटोमोबाइल उद्योग, यंत्रसामग्री डिझाइन
- **नोकरीची ठिकाणे** : ऑटोमोबाइल कंपन्या, उत्पादन क्षेत्र, संशोधन आणि विकास विभाग

### इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी

- **संधी** : वीजनिर्मिती आणि वितरण, घरगुती आणि औद्योगिक उपकरणे, देखभाल अभियंता
- **नोकरी** : वीज वितरण कंपन्या, वीज प्रकल्प, इलेक्ट्रॉनिक्स उद्योग

### सिव्हिल अभियांत्रिकी

- **संधी** : बांधकाम क्षेत्र, स्ट्रक्चरल डिझाइन, पायाभूत सुविधा प्रकल्प
- **नोकरी** : सार्वजनिक बांधकाम विभाग, नगररचना विभाग, खासगी बांधकाम कंपन्या

### इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी

- **संधी** : मोबाइल नेटवर्किंग, उपकरण उत्पादन, दूरसंचार उद्योग
- **नोकरी** : दूरसंचार कंपन्या, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन उद्योग



" दहावीनंतर तीन वर्षांत पॉलिटेक्निक अभ्यासक्रम रोजगारक्षम करतो. एनईपीनुसार नवा अभ्यासक्रम उद्योजकतेला पूरक आणि येणाऱ्या काळात मागणी चांगली असेल. स्थापत्य, विद्युत, यांत्रिकी या पारंपरिक अभ्यासक्रमातून शासकीय नोकरीच्या आणि विविध कंपन्यांमध्ये संधी आहेत. तर, संगणकाशी निगडीत इमर्जिंग शाखा एआयएमल, डेटा सायन्ससारख्या शाखांतून रोजगारक्षम बनण्याची संधी आहे.

— **अक्षय जोशी,**
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर

### ऑटोमोबाइल अभियांत्रिकी

- **संधी** : वाहन डिझाइन, वाहन चाचण्या, उत्पादन, देखभाल
- **नोकरी** : वाहन उत्पादक कंपन्या, सेवा केंद्रे, संशोधन प्रयोगशाळा

### माहिती तंत्रज्ञान

- **संधी** : सॉफ्टवेअर विकास, डेटा विश्लेषण, क्लाऊड तंत्रज्ञान
- **नोकरी** : माहिती तंत्रज्ञान कंपन्या, स्टार्टअप्स, बँका आणि सरकारी संस्था

करिअरच्या नवीन वाटा Sky is Limit... कुपन क्र. ०१


प्रश्न : पॉलिटेक्निक अभ्यासक्रमात सर्वाधिक भर कशावर असतो?

उत्तर : तांत्रिक कौशल्ये ☐
थिअरी ☐

Aurangabad, Aurangabad-Today
07/04/2025 Page No. 2

# स्कुल कनेक्ट-II उपक्रम

या विभागातील शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाव्दारे स्कुल कनेक्ट-2 या महत्वाच्या विषयावर महाविद्यालयातील तज्ञाव्दारे विविध कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्याना मार्गदर्शन









# सेवा विषयक बाबी

**१. सेवाविषयक बाबी :**

- आस्थापना विभागाशी निगडीत दीर्घ कालावधीपासुन संस्थास्तरावर प्रलंबित असलेली सेवानिवृत्ती व रजाविषयक प्रकरणे 13 पैंकी 11 प्रकरणे निकाली काढली.

**२. प्रशिक्षण:**

- IGOT प्लॅटफॉर्मवरील 858 अधिकारी / कर्मचारी यांनी प्रत्येकी किमान ५ कोर्सस पुर्ण
- यशदा, पुणे व मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रबोधिनी, पैठण येथे ५० अधिकारी व कर्मचा-यांचे पायाभूत व उजळणी प्रशिक्षण पुर्ण

**३. सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे:**

- महापार प्रणालीवर 521 अधिका-यापैंकी 507 अधिका-यांचे गोपनिय अहवालाची कार्यवाही पुर्ण. तसेच वर्ग-3 व 4 कर्मचा-यांची पारंपारिक पध्दतीने कार्यवाही करण्यात आली आहे.

४. पदोन्नती कार्यवाहीसाठी आवश्यक बिंदुनामावली व जेष्ठता सुची 2025 अदयावत करण्यात आली असुन शासन नियमानुसार 2025 मध्ये पदोन्नतीची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल.

# शासकीय उपक्रम

१. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर यांच्याकडुन विभागातील सहाय्यक कर्मचा-यांसाठी कामाच्या ठिकाणी उत्कृष्ठतेसाठी प्रशिक्षण आयोजन.

२. वाचन संकल्प महाराष्ट्राचा दि.1.1.2025 ते दि.15.1.2025 या कालावधीत घेण्यात आला.

३. स्वातंत्र्य वीर सावरकर पुण्यतिथी मरणोत्तर नेत्रदान व्याख्याने आयोजित करण्यात आली.

४. शिवजयंती निमित्त पदयात्रा काढण्यात आली.

५. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त रक्तदान शिबीरे व सलग ८ तास वाचन कार्यक्रम घेण्यात आले.






# शासकीय उपक्रम

५. एनबीए परीसस्पर्श शा.नि.२०२३ नुसार Mentor संस्था शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद व श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था, नांदेड यांनी एनबीएसाठी परिस्पर्श या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले.

६.महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत प्रत्येक महिन्यात बैठक घेण्यात येते.

७. विभागातंर्गत संस्थांना महिला सबलीकरणासाठी कराटे प्रशिक्षण आयोजित करण्याबाबत सुचित केले.

८. या कार्यालयात महिला दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त डॉ.आर.एस.पाचे यांचे महिला आरोग्याबाबत मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले.






# नाविन्यपूर्ण उपक्रम – १

१. वैद्यकीय तपासणी : विभागीय कार्यालयात अपुरे मनुष्यबळ असल्याने इतर अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कामाचा शारिरीक व मानसिक ताण येतो. त्यासाठी शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे वैद्यकीय शिबीर आयोजित करण्यात आले होते.

सदर शिबीरात खालीलप्रमाणे चाचण्या करण्यात आल्या.

डोळे तपासणी, रक्तदाब तपासणी, साखर तपासणी, ईसीजी इ.



२. ग्रंथालय : विभागीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता ग्रंथालय विभाग सुरु करण्यात येवुन विविध विषयांची पुस्तके वाचनाकरिता उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

# नाविन्यपूर्ण उपक्रम – २

जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास व सामाजिक जागरुकता या विषयावर युवा संवाद कार्यक्रमाचे दिनांक 07 ऑक्टोबर, 2024 रोजी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले होते.

सदर उपक्रमामध्ये जिल्हयातील सर्व संस्थांमधील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.






# नाविन्यपूर्ण उपक्रम – ३

या विभागातील शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात देहदान या महत्वाच्या विषयावर शासकीय इस्पितळ व वैद्यकीय महाविद्यालय येथील तज्ञाव्दारे मार्गदर्शन आणि प्रतिज्ञापत्र भरणे ची मोहिमेचे आयोजन







या विभागातील शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात आर्थिक नियोजन या महत्वाच्या विषयावर तज्ञाव्दारे मार्गदर्शन

या विभागातील शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात जागतिक औषधनिर्माणदिवस (World Pharmacist Day) मोठया प्रमाणात साजरा



# धन्यवाद !

